MHGO050006622022

**एम. जे. सी. क्र. ३१/२०२२**
**योगिता शंकर ठवरे + ३ वि. कोणी नाही**

**आदेश निशाणी क्र. १ वर**
**(दिनांक २२.१२.२०२२)**

अर्जदारांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट, १८२७ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन येणेप्रमाणे –

अर्जदार क्र. १ ही मयत शंकर सोनीराम ठवरे यांची पत्नी आहे. मयत शंकर सोनीराम ठवरे हे दिनांक १४.१०.२०२२ रोजी ७ स्टार हास्पीटल, नागपुर येथे उपचारादरम्यान मरण पावले आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयत शंकर सोनीराम ठवरे यांची मुली आहेत, अर्जदार क्र. ४ ही मयत शंकर सोनीराम ठवरे यांची आई आहे. मयत शंकर सोनीराम ठवरे यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस आहेत. मयत शंकर सोनीराम ठवरे यांचे वडील नामे सोनीराम अंतारामजी ठवरे हे दिनांक १८.०१.२०१७ मध्ये मरण पावले आहे.

३. मयत शंकर सोनीराम ठवरे हे व्रिकमबाबा हायस्कुल, डोंगरगाव / खजरी येथे मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत होते. त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी, शासकीय कामाकरिता तसेच त्यांच्या नावावर असलेले बॅक खाते हाताळण्याकरीता व त्यांच्या नावावर असलेले प्लाट, घर व शेती त्यांच्या वारसानांच्या नावाने चढविण्याकरीता अर्जदार क्र. १ ते ४ यांनी ते मयत शंकर सोनीराम ठवरे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे.

४. अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना वारस दाखला मिळण्यासाठी कोणाची हरकत असल्याबाबतची बाब जाणुन घेण्यासाठी अर्जदारांनी अर्जाची जाहीर नोटीस दैनिक वृत्तपत्र नामे **‘दैनिक कशिश’** मध्ये दिनांक १९.११.२०२२ रोजी प्रसिध्द केली आहे. परंतु जाहीर नोटीस प्रसिध्द करूनही सदर

अर्जास हरकत घेण्यासाठी कोणीही हजर झालेले नाही.

५.    अर्जदारांचे अर्जातील कथनावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणेमिमांसासही मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत शंकर सोनीराम ठवरे यांचे कायदेशीर वारस असल्याचे शाबित करतात काय ? | **होकारार्थी.** |
| २) | अंतिम आदेश काय? | **अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात आला.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

***<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :—***

६.    अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ अर्जदार क्र. १ हिने तिचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ०८ वर दाखल केले असुन अर्जदार हेच मयताचे वारस असुन त्यांचे नावे वारस दाखला मिळण्याची विनंती केली आहे. अर्जदारांनी त्यांच्या अर्जातील कथनांच्या शाबितीकरणासाठी कागदोपत्री पुराव्यात अर्जदार क्र.१ चे पती नामे शंकर सोनीराम ठवरे यांचे आधार कार्ड व मृत्यु प्रमाणपत्र अनुक्रमे निशाणी क्र. ०९ व १० वर, पोलीस पाटील, डोंगरगाव/ खजरी, सडक अर्जुनी यांनी दिलेले वारसान प्रमाणपत्र निशाणी क्र. ११ वर, ग्राम पंचायत, डोंगरगाव/ खजरी, सडक अर्जुनी यांनी दिलेले वारसान प्रमाणपत्र निशाणी क्र. १२ वर, अर्जदार क्र. १ ते ३ यांचे आधार कार्ड अनुक्रमे निशाणी क्र. १३ ते १५ वर, मृतकाचे वडील सोनीराम अंतारामजी ठवरे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी क्र. १६ वर, अर्जदार क्र. ४ हिचे आधार कार्ड अनुक्रमे निशाणी क्र. १७ वर, दैनिक कशिश वृत्तपत्रात दिनांक १९.११.२०२२ रोजी दिलेल्या नोटीस व पावतीची मुळ प्रत अनुक्रमे निशाणी क्र. १८ व १९ वर दाखल केले आहे.

७.    मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचा न्यायनिर्णय ***<u>गणपती विनायक अचवल विरूध्द स्टेट, एम.एच.एल.जे. २०१४ (६) ६८३</u>*** यात पॅरा क्र.५ व ६ मध्ये असे नमुद केले आहे की,

*"5. The position of law that emerges from the above provisions is that, an heirship certificate does not bestow the status of an heir upon a person. Grant of such a certificate is only a formal recognition of his existing status*

*as an heir. An heir or executor or legal administrator, by his such status, can assume management of the property of the deceased even without a formal recognition by the Court. A person may obtain heirship certificate is any of the three situations i.e. (i) if he so desires (ii) where his right as an heir is disputed, and (iii) in order to give confidence to the persons in possession of or indebted to the Page numbers estate and to deal with them. Thus grant of heirship certificate is solely, for the convenience of the heir. Beyond that, it is of no significance. The rules also indicate that, it is mandatory for the Court to issue an heirship certificate, if after publication of citation, no objector comes forward within one month from the date of publication. In that case, the Court shall forthwith receive such proof as may be offered of the right of the person making the claim, and if satisfied, shall grant a certificate in the prescribed form declaring him the recognized heir of the deceased. The scope of such enquiry is limited to ascertain the claim of heirship of the applicant. The petitioner's claim and the impugned order are required to be appreciated against the above legal position.*

*6. In view of the above legal position, I find that Mr. Badgujar is right in his submission that, the trial Court lost sight of the fact of the purpose of obtaining heirship certificate. It is not for management of the property as already noted above. It is essentially a formal recognition of status of a person. Therefore, physical health or strength of the petitioner was not a factor relevant to be taken into consideration for grant or refusal of the heirship certificate. The only relevant consideration was, whether the applicant establishes that he is the heir of a person in respect of whom, he seeks heirship certificate. If no objector comes forward as provided by Rule-3 of Chapter-I of the Regulation, the Court must grant certificate to the applicant. This view is fortified by the decision of Single Judge of this Court, relied upon by Mr. Badgujar. By the judgment and order dated 16th March, 2011 passed in Writ Petition No. 302 of 2011 by Nagpur Bench of our High Court in the case of Vilas Sadanand Sapre (Mentally Challenged) through Guardian Sister Sau. Anuradha Dhananjay Bhate and anr. Versus. The Civil Judge, Senior Divison, Amravati. The petitioner in that case was denied heirship certificate on the ground that, he was mentally challenged. The trial Court had held that, unless the next friend and guardian, who had fled the application was appointed as an 'Guardian' through the court of competent jurisdiction under the provisions of the Mental Health Act, she could not act*

*on behalf of the petitioner and fle application. This Court, looking into the purpose of issuance of issuance of heirship certificate under the Regulations held that, for considering such an application, the Court is not required to determine the title of Page numbers the deceased or the persons claiming heir ship certificate to any property. The Court is only required to consider whether the persons claiming heirship certificate is the heir of the deceased".*

८. वर नमुद मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांच्या उपरोक्त न्यायनिवाड्यात नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराने केलेल्या मागणीस दैनिक वृत्तपत्र नामे 'दैनिक कशिश' आणि जाहीरनामा प्रसिध्द करूनही कोणीही हरकत घेण्यास न्यायालयासमोर हजर झालेले नाहीत. तसेच अर्जदारांनी दिलेल्या पुराव्यास कोणीही उलटतपास नोंदविलेला नसल्याने तो विनाआव्हानाचा ठरला आहे. त्यामुळे अर्जदारांनी केलेल्या मागणीप्रमाणे अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस दाखला मिळण्यास पात्र ठरतात व त्याप्रमाणे मी **मुद्दा क्र. १** चे उत्तर **होकारार्थी** नोंदवित आहे व **मुद्दा क्र. २** चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**१)** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**२)** अर्जदार क्र. १ ते ४ हे **मयत शंकर सोनीराम ठवरे** यांचे कायदेशीर वारसदार असुन त्यांनी नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

**३)** सदर वारस दाखल्याचा उपयोग हा अर्जदारांनी अर्जात नमुद केलेल्या कारणासाठी करण्यात यावा.

**४)** अर्जदारांनी दिवाणी नियम पुस्तिका चे प्रकरण १४ प्रमाणे पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2022.12.22 15:54:34 +0530

**दिनांक : २२.१२.२०२२**
**ठिकाण : सडक अर्जुनी**

**(डॉ. विक्रम अं. आव्हाड)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**सडक अर्जुनी.**

मी प्रमाणीत करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकुर व मुळ न्यायनिर्णय मधील मजकुर हा एकसारखाच आहे.

लघुलेखकाचे नाव : आर. डी. भुजाडे
कोर्टाचे नाव : डॉ. वि. अं. आव्हाड,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सडक अर्जुनी

न्यायनिर्णय/आदेश दिनांक : २२.१२.२०२२
पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख : २२.१२.२०२२
न्यायनिर्णय/आदेश अपलोड केलेली तारीख : २२.१२.२०२२